
"The oyster and the raindrop
to make the pearl together,
A flower and its fragrance to
Spread beauty forever,
All in the world,
God has paired a soulmate for a soul.
He's made it invincible."
"The oyster and the raindrop
to make the pearl together,
A flower and its fragrance to
Spread beauty forever,
All in the world,
God has paired a soulmate for a soul.
He's made it invincible."

- **VIBGYOR**

  Bi-annual Multidisciplinary Research Journal
  Volume VII / No. 1, February 2018

- Published By
  **Research Journal Publication Committee**
  Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur
  Dist. Nagpur - 441201(M.S.) India
  Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240
  E-mail : vibgyorbmv@yahoo.in
  Website : www.bgm.ac.in

- **UGC Approved List of Journals**
  **Journal No. 46447**

- **ISSN-2277-4491**

- **Special Edition : February 2018**

- **© Author**

  Copyright © All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrival system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocopying, recording or otherwise without prior permission of the Editor.

  The papers included in this publication have been directly reproduced, with minimum editorial intervention, from the files sent by the respective authors. Opinions expressed in the research papers are those of contributors and do not necessarily match the views of Research Journal Committee of the college. The Publisher or Editorial Board is not responsible for any information contained therein.

- **Type Setting**
  **Scan Dot Computer,**
  Mahal, Nagpur Mobile : 9822565782
  E-Mail : aakar100@gmail.com

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. सिंदखेडकर जाधवांची ऐतिहासिक कामगिरी | प्रा. डॉ. शरद आर. डवरे | ७ |
| २. यशवंत मनोहर यांची कविता | डॉ. जगदिश्वर मुरारी मेश्राम | १० |
| ३. भारतीय शेतकरी आणि भारतीय कृषी विषयक धोरण | प्रा.डॉ. राजेश पी. कांबळे | १३ |
| ४. नोटबंदीमुळे अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम | प्रा. डॉ. सुरेंद्र पोथारे | १७ |
| ५. आमनेर किल्ला - एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप | प्रा. डॉ. विलास भा. फरकाडे | १९ |
| ६. महात्मा ज्योतिबा फुलेंचा सामाजिक विचार | प्रा. डॉ. लखपती बा. गायकवाड | २२ |
| ७. चिमूरचे श्रीहरी बालाजी मंदीर : ऐतिहासिक दर्शन | प्रा. डॉ. नथ्थु सिताराम गिरडे | २५ |
| ८. कुसमायोजित विद्यार्थ्यांच्या विविध समस्या, उपाययोजना व पालकांची भुमिका | डॉ. सौ. शुभांगी अ. रोडे | २७ |
| ९. नागपूर जिल्ह्यातील म्हाडाच्या मध्यम उत्पन्न गटातील गाळ्यांचे गृहआयोजन सिध्दांतानुसार मूल्यमापन | डॉ. सुजाता साखरे | ३० |
| १०. नागपूर जिल्ह्यातील धर्मांतरीत बौध्दाच्या आर्थिक समस्या | प्रा. किशोर जगन्नाथ शेन्डे, डॉ. सुनिल शिंदे | ३३ |
| ११. नागपूर जिल्ह्यातील पेंच जलसिंचन प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या गावातील शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषनात्मक अध्ययन | विजय मारोतराव रोडे, डॉ. सतिश पुंडलीकराव डुडुरे | ३५ |
| १२. बंजारा समाजातील राजकीय स्थित्यंतरे | डॉ. मोतीराज रा. चव्हाण | ३९ |
| १३. विदर्भातील पर्यटन क्षेत्रात होत असलेल्या विकासात्मक प्रयत्नांचा आढावा व विकाससंबंधी स्थानिक नागरीकांच्या अभिवृत्तीचे अध्ययन | प्रा. डॉ. दिलीप चव्हाण | ४२ |
| १४. ग्रामीण कृषी उद्योग आणि लहान शेतकऱ्यांचा विकास : समस्या आणि आव्हाने | डॉ. गजानन भा. पाटील | ४५ |
| १५. खेळाडूवर आहाराचा प्रभाव | प्रा. आदित्य किशोर सारवे | ५० |
| १६. नागपूर शहरातील औद्योगिक प्रतिष्ठानाकडून सी.एस.आर. योजनेमार्फत राबविण्यात येणारे विविध कार्यक्रमाचे अध्ययन | डॉ. अशोक धोटे | ५२ |
| १७. ऐतिहासिक कागदपत्रांची निवड | डॉ. महेंद्र गायकवाड | ५५ |
| १८. बाबु हरिदास आवळे व कामगार चळवळ : एक समिक्षात्मक अध्ययन | प्रा. डॉ. सी. एस. पाटिल | ५८ |
| १९. भंडारा जिल्ह्यातील साहित्य कलेत गुंतलेला आदिम समाज | डॉ. मधुकर वि. नंदनवार | ६२ |
| २०. भंडारा जिल्ह्यातील स्त्रियांची अप्रकाशित लोकगीते | सदानंद कोठीराम जांगळे | ६५ |
| २१. भंडारा जिल्ह्यातील अप्रकाशित लोकगीतांचे वाङ्मयीन सौंदर्य | सदानंद कोठीराम जांगळे | ६७ |
| २२. महिला सशक्तीकरण : एक दृष्टीकोन | प्रा. डॉ. विमल राठोड | ६९ |
| २३. शालेय वातावरणाचा व्यक्तीमत्वावर पडणारा प्रभाव: एक विश्लेषण | प्रा. डॉ. अनिता विवेक महावादीवार | ७२ |
| २४. बदलत्या युगातील "शिक्षक ग्रंथपाल" - एक सर्वेक्षण | प्रा. प्रेमा ए. कुभंलकर | ७६ |
| २५. यशवंत मनोहर यांच्या कवितेची भाषा | वैशाली धनविजय | ७९ |
| २६. गौतम बुद्धाचा स्त्रीविषयक दृष्टिकोण | डॉ. दीपाली डी. भावे | ८२ |
| २७. मानवी अधिकार आणि एड्स | प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने | ८४ |
| २८. मराठी नाटकांचे सांस्कृतिक योगदान | डॉ. रवींद्र शोभणे, | ८६ |
| २९. युगपुरुष शिवराय : एक आकलन | प्रा. डॉ. प्रफुल्ल तु. वऱ्होड | ८८ |
| ३०. लोकमाता अहिल्यादेवी होळकर | प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे | ९२ |
| ३१. स्थानिक नागरीकांच्या अभिवृत्तीचे अध्ययन | | |
| ३२. विदर्भातील पर्यटन क्षेत्रात होत असलेल्या विकासात्मक प्रयत्नांचा आढावा व विकाससंबंधी | प्रा. हरेश टि. गजभिये | ९४ |
| ३३. जागतिकीकरण आणि सामाजिक प्रश्न | डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. अनिल बोपचे | ९७ |
| ३४. विदर्भ के मुस्लिम बहुल क्षेत्र के छात्रों की सामाजिक एवं आर्थिक परिस्थिती का उनकी अभिवृत्ति पर होने वाले परिणामों का अध्ययन | नाजिश इरम तुफैल अशर, डॉ. एन.ए. काजी | ९९ |
| ३५. डॉ. बाबासाहब आम्बेडकर के नागपूर धम्मदीक्षा समारोह में वामनराव गोडबोले का योगदान | डॉ. सुर्यकांत महादेवराव कापशीकर | १०१ |
| ३६. बुध्द और उनका अष्टांग मार्ग | डॉ. अतुल महाजन | १०३ |

# भंडारा जिल्ह्यातील साहित्य कलेत गुंतलेला आदिम समाज

❑ डॉ. मधुकर वि. नंदनवार
भिवापूर महविद्यालय भिवापूर

**सारांश :-**

भारतातील आदिम किंवा आदिवासी समाजाला धरतीची लेकरं म्हणतात. अगदी आदिम काळापासून वास्तव्य करणारे ते आदिवासीवासी असाही उल्लेख करण्यात येतो. भारतात पुरातन काळापासून आदिम समाज आस्तित्वात आहे. भारतीय राज्यघटनेत मात्र त्यांचा उल्लेखअनुसूचित जमात असा केलेला आहे. "समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिवासी समाज म्हणतात".आदिवासी समाज हा एक साधा व सरळ सामाजिक समूह आहे. हा समाजाचा घटक समान सांस्कृतिक जीवन जगणारा परंतु कित्येक वर्षे अक्षर ओळख नसलेला स्थानीय गटांचा समुच्चय आहे. आदिवासी समाज हा इतर कोणत्याही समाजापेक्षा अनेक दृष्टीनी वेगळा असल्याचे सर्वज्ञात आहे. विशिष्ट भूप्रदेश, प्रमाणलघुता, एकाच रक्तसंबंधावर आधारित, स्वतःची स्वतंत्र अशी बोलीभाषा परंतु लिपीचा अभाव, वेगळी जीवनपध्दती, साधी अर्थव्यवस्था, सीमित मंत्र, तंत्रविद्या, समान धर्म, सामाजिक एकजिनसीपणा इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त अशा आदिम समाजाचे वेगळेपण नजरेत भरुन येते.

भारतीय आदिवासी व लोकसाहित्य यांचा अनोन्य संबंध आहे. लोकसाहित्याची व्याप्ती सांगताना अमेरिकन अभ्यासक अलेक्झांडर क्राप म्हणतो, लोकसाहित्यात लोकगीते,लोककथा, म्हणी, यंत्र-तंत्र, लोकभ्रम, वनस्पतीविद्या, प्राणिविद्या, खनिजविद्या, नक्षत्रविद्या, विधिनिषेध, जादूटोणा, लोकनृत्य आणि लोकनाट्य इत्यादींचा समावेश होतो. आदिवासींच्या समग्र जीवनात लोकसाहित्याच्या या सर्व अंगांचा अंतर्भाव होतो हे सत्य आहे. 'आदिमानवाच्या मुखातून आनंदाच्या क्षणी निघालेलेले उत्स्फूर्त हुंकार हे लोकगीताचे स्वर घेऊनच जन्माला आले. आदिम समाज हाच लोकसाहित्याचा खरा वारसदार आहे. निसर्गाच्या सान्निध्यात वावरणारा हा धरतीचा पुत्र लोकसाहित्याचा प्रथम निर्माता आहे. लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक ना.रा. शेंडे म्हणतात,"आदिसंतानी शून्यातून नियतीच्या कलानुसार जीवन आविष्कृत केले नव्हे अलंकृतही केले. त्यांनी ध्वनी निर्माण केला, आणि त्याला शब्दाकार दिला. शब्दात त्यांनी विविध भावरंग भरले. तरल कल्पकतेने शब्दांशब्दांची मधुर अशी प्रभावी जुळणी केली. आणि नवरसांनी त्यांनी लोकवाङ्मयाची सहजस्फूर्त उभारणी करून रंगरूपासह त्याचा अत्यंत मधुर गंध दरवळविला. ध्वनी, शब्द, रंग, रूप आणि गंध यांचा लोक साहित्यात आविष्कार घडवूनच नव्हे तर नाट्य, नृत्य व संगीत इत्यादी कलांची निर्मिती करून आदिसंतानी सांस्कृतिक जीवन तेजोवर्धित केले आहे. विविध प्रतिमा आणि प्रतीके दर्शवून त्यांनी जीवनातील विविध पैलूंची रसोत्कट अभिव्यक्ती घडविली आणि आपल्या संस्कृतिची अस्मिता प्रगट केली." आदिम, आदिवासी समाजाचे प्राचीनतम असे अस्तित्व यावरुन सिध्द होते.

महाराष्ट्रात भिल्ल, कोलाम, कोळी, वारली, ठाकूर, माडिया, परधान, कोरकू, पहाडी, कोरवा, गोंड, गोवारी, माना, हलबा, हलबी इ. आदिवासी जमाती आहेत. प्रामुख्याने भंडारा जिल्ह्याचा विचार केल्यास गोंड, गोवारी, माना, हलबा, हलबी या आदिवासी जमाती दिसून येतात. या आदिवासी जमातींचा व त्यांच्या साहित्य कलेच्या संदर्भात या संशोधनपर लेखात अल्पसा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

भंडारा जिल्ह्यात 'गोंड' ही आदिवासी जमात दुर्गादेवीची भक्त आहे असे आढळून येते. गोंडात सहादेवे आणि सातदेवे असे दोन गट पडतात. गोंड जमातीत प्रौढ विवाह पध्दती दिसते. वधूमूल्य देण्याची रीत असून वराच्या घरी लग्न लागण्याची पध्दत आहे. मातीच्या बोहल्याभेवती सात फेरे मारणे हा त्यांचा लग्नविधी असतो. विधवा विवाहाचीही प्रथा आहे. शरीरावर गोंदण्याची चाल आहे. ज्या स्त्रीने गोंदन केले नाही तिला अपवित्र मानतात. देवाची पूजा करण्यापासून तिला वंचित केले जाते. खुटदेव, शिवाऱ्यादेव, नारायनदेव, सातआसरा, मातामाय इ. देवदेवतांचे पुजन केले जाते. शिवाऱ्या देवाला कोंबडा व बकऱ्याचा बळी देण्यात येते. नारायण देवाला डुकराचा बळी दिला जातो.

गोवारी ही पशूपालन करणारी जमात आहे. गायगोवारी, इंगोगोवारी, गोंडगोवारी या नावाने गोवरी जमातीचे वास्तव्य जिल्हयात अस्तित्वात आहे. या जमाती विषयी अशी लोककथा प्रचलित आहे की, भगवान कृष्णाच्या गाई चरायला नेणाऱ्या अहिराला एक रडत असलेला मुलगा जंगलात दिसला. तेव्हा त्याने त्या मुलाला घरी नेले. पालनपोषण केले. आपल्यासारखे गाई सांभाळण्याचे काम दिले. हाच गोवारींचा मूळपुरुष होय. जंगलात सापडलेला मुलगा जो गोवारी लोकांचा मुळपुरुष होता तो गोंड होता. याचा अर्थ अहिर व गोंड यांची मिश्र जात म्हणजे गोवारी होय. बायका उजव्या हाताच्या कोपराखाली नागमोडी पध्दतीने गोंदवून घेतात. त्याला सीतेचा हात म्हणतात. गोवारी मेघनाथ,

वाघोबा देव, दुल्हादेव, ठाकूरदेव यांची पूजा करतात.

माना आणि गोवारी ह्या गोंडांच्या उपजाती आहेत. भंडारा जिल्ह्यात मानांविषयी दंतकथा प्रचलित आहे. पिकांची नासाडी करणाऱ्या घारीची शिकार मानाने केल्यामुळे त्या मानांना गोंड राजाने जमीनदारी दिली. माना हे प्रतिष्ठित वंशाचे होत. गोंडाचे सरदार म्हणून अतिप्राचीन भागात त्यांची ख्याती आहे हे आजही दिसून येते.

भंडारा जिल्ह्यात 'हलबा' ही प्राचीन आदिवासी जमात आहे. ही जमात मुळची छत्तीसगड राज्यातील बस्तर भागातील असून सन १७७४-१७७९ सालच्या आसपास तिकडे झालेल्या हलबा विद्रोहानंतर महाराष्ट्रात येवून स्थायिक झालेले आहेत. काही हलबांनी गोंड राजाकडे सैनिक म्हणून नोकरी केली, तर काही हलबांनी शेतकरी व्यवसायाचा स्विकार केला. हलबा व हलबी ही तत्सम जमात असून विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, अमरावती, यवतमाळ इ. जिल्ह्यात प्रामुख्याने वास्तव्यास आहे.

हलबांच्या उत्पत्तीसंबंधी मनोरंजक लोककथा उपलब्ध आहे. एका उरिया राजाने आपल्या शेतातील पिकांचे रक्षण करण्यासाठी चार कोल्ह्यांना बुजगावणी उभी केलीत. एके रात्री तेथून शंकर पार्वती जात असताना पार्वतीच्या आग्रहावरून शंकर देवाने त्यांना सजीव केले. ते चौघेजन (दोन पुरुष व दोन स्त्रिया) राजाकडे गेले असता राजा म्हणाला, "तुम्ही पृथ्वीवर आला आहात तर तुम्हाला जात हवी. तुम्ही शंकर देवाकडे जा" तेव्हा ते शंकर देवाकडे धावत जाऊ लागले. श्री शंकराने सांगितले, "मारखे हात हल्वीत तुम्ही आमचे लक्ष वेधून घेतले, तेव्हा तुम्ही हलबा म्हणजेच हलवा." अशी एक लोककथा आहे. हलबा संबंधी आणखी दुसरी लोककथा अशी - हलबा जमात उत्तरेत असताना त्यांच्यातील सुंदर मुलीला बादशहाने मागणी घातली. तेव्हा संकटात सापडू म्हणून त्यांनी चंद्रपूरच्या गोंड राजाचा आश्रय घेतला. आणि मग इकडेच जमिनी घेवून स्थायीक झाले. सर जी.एस. ग्रीयर्सन यांनी हलबांच्या संदर्भात एक पुराणकथा सांगितली आहे. श्रीकृष्णाचा भाऊ बलरामाने हल तयार केले, व त्यानंतर मातीच्या ढिगातून हलधर निर्माण केले. हेच ते हलबा होत.

हलबा जमातीचे लोक हलबी भाषा बोलतात. हलबी भाषा ही मराठी, हिंदी व उडीया भाषेचे मिश्रण आहे. हलबा जमात निसर्गपूजक असून बडादेव महादेव, ठाकूरदेव, दुल्हादेव, गडकीमाता, नागपनदेव, शिवान्या, वाघदेव, मातामाय,मरीमाय, दुर्गादेवी, सटवाई, मानआसरा इ. देवदेवतांची पूजा करतात. हलबा जमातीमध्ये अखाडी, जिवती, हरेली (नवाखाणी), सिगटा, तिज(अखजी) गायगोंदन इ. सण साजरे केले जातात. देवळाची पूजा करणाराला भगत असे म्हणतात. कोंबड्यावर मरी येऊनये म्हणून मातामाय देवीला कोंबडीचे पिल्लू अर्पण केले जाते. हलबा आदिवासी जमातीचा प्रमुख नृत्य प्रकार भवर नृत्य होय. हे नृत्य लग्नप्रसंगी करण्यात येते. तसेच चैत्र पौर्णिमेला रात्री मातामाय देवी समोर नृत्य केले जाते ते नृत्य तेल लावून करतात. हलबा जमातीत प्रौढ विवाह पध्दती असून वधूच्या घरी लग्नविधी पार पडतो. विधवा विवाहाची प्रथा आहे. लहान मुली डावी नाकपुडी टोचून घेतात.कपाळावर व गालावर टिंब गोंदवून घेत. लग्नानंतर स्त्रिया घोट्याच्यावर व हातावर रेषा, टिंब, विंचु, प्राणी, पक्षी गोंदवून घेत असतात.

या आदिवासी जमातीत गीतगायनाचे प्रसंग वारंवार येतात. अंगाईगीते, प्रीतिगीते, युध्दगीते, भजने हे प्रकार आढळतात. गीतांचा व साहित्याचा अर्थात संस्कृतिशी निकटचा संबंध असतो. जमातीचा इतिहास सांगण्यासाठी व आयुष्यातील वेगवेगळ्या प्रसंगाचे वर्णन करण्यासाठी गीतरचना करण्यात येते. त्यांच्या कथांत शिकारीचे अनुभव, प्रणय व प्रणयातील खोटी भांडणे, विवाह प्रसंगाचे चित्रण इत्यादींचे रसभरीत वर्णन असते. सृष्टी, जमात व कुळी यांच्या कथा असतात.

आदिम समाजात पुरातन काळापासून लोकगीते प्रचलीत आहे. आदिवासींच्या गीतांचे काही प्रकार महत्वाचे आहेत. १) प्रासंगिक गीते २) कुळी गीते ३) धार्मिक गीते ४) स्त्रीगीते ५) बोधगीते याशिवाय म्हणी, उखाणे इत्यादीही आदिवासी जमातीही आवळून घेतात. प्रसंगानुरुप आजही अशा गीतांचा वापर होतांना दिसतो. लोकनृत्याच्या जोडीला लोकगीतांची साथ पूर्वापार परंपरेने आदिवासी समाजाने जपलेली आहे. हे आदिवासी समाजाचे द्योतक म्हणावे लागेल.

आदिवासी जमातीत संध्याकाळी युवक व युवती एका ठिकाणी जमून एकत्र नृत्य करतात. अशा तरुण तरुणींस आपआपले जोडीदार निवडण्याची मोकळीक असल्याने प्रियाराधन करण्यासाठी गीतांचा भरपूर उपयोग करण्यात येतो.त्यांच्यात संगीत-नृत्याला फार महत्व असते व सर्व लोक त्यात उत्साहाने भाग घेतात.

आदिवासींची वाद्येही महत्वाची आहेत.ही वाद्ये त्यांच्या आसपास मिळणाऱ्या व सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तूंनी बनवलेली असतात. निरनिराळ्या प्रकारचे ढोल, बासुरी, टाळ, टिपऱ्या, एकतारी ही वाद्य त्याच्यात आढळतात. धर्म व जादू यांच्याशी आदिवासींची कला निगडीत आहे. ती प्रामुख्याने कार्योपयोगी असतात. उपयुक्त वस्तूंना कलात्मक रूप देण्याची प्रवृत्ती आदिवासी समाजात आढळते. होडी, वाद्ये, भिंती यावर काढलेल्या आकृत्या पुष्कळदा चेटकापासून त्या त्या वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी काढलेल्या असतात. भिंतीवर जिवती देवीपुजन, नागपंचमीला नाग काढणे आजही अस्तित्वात आहे. परंतु कित्येकदा त्यामागे आदिवासींची सौंदर्यदृष्टीही संभवते. पाषाणांची व शिंपल्यांची आभूषणे अश्मयुगातही होती नंतर अस्थी व कच्या धातूंचा वापर त्याकरिता करण्यात येऊ लागला. मातीची किंवा लाकडी भांडी, मुखवटे, गणचिन्हे इत्यादीतून आदिवासी

कलेचे दर्शन घडते. आदिवासी कला बऱ्याच अंशी प्रतिकात्मक असतात. धर्मिक प्रतिके वापरण्यात आल्यामुळे केवळ आदिवासींनाच त्यांची कला उमगू लागते. आदिवासी कलेचा उपयोग जमातीच्या मूल्यांचा व आचार-विचारांचा प्रसार करण्यासाठी करण्यात येतो असे दिसते.

आदिवासी लोक अलंकार तर वापरतातच, पण त्याशिवाय आपले शरीर रंगवतात, शरीराच्या हातावर, चेहऱ्यावर गोंदवितात, व डाग देऊन त्यावर विंचु प्राणी, चंद्र, देवी देवता इत्यादींच्या आकृत्या काढतात. लाकूड, दगड, हाड, कवड्या यांचा उपयोग अलंकार बनविण्यासाठी करण्यात येतो. रंगीत बिया, मणी, पीसे यांचाही अलंकार म्हणून उपयोग केल्या जातो.

आदिवासी हा निसर्गपूजक आहे. निसर्गातील चांगल्या आणि वाईट शक्तींना संतुष्ट करण्यासाठी, मृत पूर्वजांच्या सन्मानार्थ, ऋतूपरिवर्तन व वर्षबदल म्हणून, जन्मापासून तर मृत्युपर्यंतच्या संस्कारप्रित्यर्थ, सण उत्सवप्रसंगी आदिवासी जमातीत नृत्य नाचली जातात. ही लोकनृत्य असतात. धार्मिक भावना आणि आनंदाचा मेळ यातून योग्यरितीने घालण्यात येतो.

आदिवासी लोकसमूह हा एका आगळ्या वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा वर्ग आहे यात शंका नाही. ही संस्कृती स्वाभाविकपणे जगणारी व निसर्गाला अधिक जवळची आहे. आदिवासींच्या साहित्यिक प्रेरणा त्यांच्या जीवनानुभूतीशी समरस असल्यामुळे, आदिवासींचे साहित्य हे भावनोत्कट साहित्य आहे. त्यामुळे त्यात कृत्रिम जोडाजोडीचा लवलेशही दिसत नाही. म्हणूनच ते प्राचीन काळापासून आजही जीवंत आहे.परंतु आजच्या सांस्कृतिक परिवर्तनाच्या काळात आदिवासींच्या लोककलांचा काही प्रमाणात विलय होतांना दिसतो. ही बाब मनाला निश्चितच खिन्न करणारी आहे.

आदिवासींच्या लोककलांचा हा सांस्कृतिक वारसा कालैघात नष्ट होणारा असला तरी आजच्या विज्ञान व तंज्ञानाच्या युगात प्रयत्नपूर्वक लोककलांचे संवर्धन व जपणूक होणे काळाची गरज आहे. त्यासाठी या कलांना आजच्या स्थितीला लिखीवद्ध करणे, आदिवासींच्या लोककलांना ध्वनिमुद्रित व चित्रमुद्रित करून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. असे कार्य आदिवासी समाजातील साहित्यिकांनी करणे योग्य वाटते. असे कार्य साहित्यिक व शासन स्तरावर व्हावे अशी अपेक्षा आहे. असे काय झाले तर पुढच्या पिढीलाही त्याचा आस्वाद घेता येऊ शकेल व त्यातून भारतीयांच्या पूर्वकलावैभवाची साक्ष पुढच्या पिढीला सातत्याने प्रेरणा देत राहील हे निर्विवाद सत्य आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. लोककथा - सरोजिनी बाबर
२. लोकसाहित्याची रूपरेखा - दुर्गा भागवत
३. आदिवासी लोककथा - गोविंद गारे
४. लोकसाहित्य संपदा- ना.रा. शेंडे
५. दलित व आदिवासींचे समाजशास्त्र - प्रदिप आगलावे

☆☆☆